## फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२६/२०२६ मधील नि. १ खालील आदेश.

(विजय गहाणे वि. महाराष्ट्र शासन )

अर्जदार यांनी प्रस्तूतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ प्रमाणे सिंदेवाही पोलीस ठाण्या अंतर्गत दाखल गु.र.नं.४०२/२०२६ मध्ये जप्त केलेली होंडा कंपनीची दुचाकी याचा नोंदणी क्रमांक एम.एच.–३४–सी.टी.–७६५७ याचा चॅसीस क्र. **ME4JC94DLSG**038037 व इंजिन क्र.**JC94EG**3792441 हे वाहन परत मिळावी यासाठी दाखल केला आहे.

२. विद्वान सरकारी विधिज्ञ यांनी अर्जावर त्यांचे म्हणणे सादर करुन विरोध दर्शविला आहे. त्यांनी असे कळविले की, जर जप्त वाहन अर्जदारास सुपुर्तनाम्यावर परत दिल्यास अर्जदार वरील प्रमाणे पुन्हा गुन्हा करण्याची शक्यता आहे. करीता, त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली. तसेच तपासी अंमलदार यांनी निशाणी ०६ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन असे कळविले की, वर नमुद मोटारसायकल पोलीस स्टेशनला जप्त असुन अर्जदाराने त्याचे मालकीबाबतची कागदपत्रे पोलीस स्टेशनला सादर केली नाहीत. तसेच जर जप्त वाहन अर्जदारास सुपुर्तनाम्यावर परत दिल्यास अर्जदार वरील प्रमाणे पुन्हा गुन्हा करण्याची शक्यता आहे. करीता, त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

३. अर्जदाराने त्याच्या अर्जाचे पृष्ठयार्थ निशाणी ४ चे यादी सोबत जप्त वाहनाचे पर्टीकुलर, व अर्जदाराचे आधार कार्ड यांच्या सत्यप्रती दाखल केल्या आहेत.

४. अर्जदारातर्फे दाखल कागदपत्रांवरुन व अभिलेखावरुन गु.र.नं. ४०२/२०२६ या प्रकरणात मिळून आलेली होंडा कंपनीची दुचाकी याचा नोंदणी क्रमांक एम.एच.–३४–सी.टी.–७६५७ हे वाहन अर्जदार याचे असल्याचे दिसून येते. सदरचे वाहन सद्यास्थितीत वर नमुद गुन्ह्यात जप्त आहे. गु.र.नं. ४०२/२०२६ या गुन्ह्याचे चौकशी होवून प्रकरण निकाली होण्यास बराच कालावधी लागणार आहे. दरम्यानच्या काळात प्रस्तुत गुन्ह्याच्या कामी जप्त केलेले वर नमुद वाहन पोलीस स्टेशनमध्ये पडून राहील्यास ते खराब होवुन त्याचे मुल्य कमी होणार आहे. तसेच अभिलेखावर दाखल कागदपत्रांवरुन अर्जदार हा जप्त वाहनाचा मालक असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे, सरकारी विधीज्ञ व तपासी अंमलदार यांनी दिलेले म्हणणे पाहता वर नमुद जप्त दुचाकी वाहनाचा अंतरीम ताबा

अर्जदारास अटी व शर्तीवर दिल्यास न्यायाचा योग्य समतोल साधता येईल.

**५.** एकंदरीत, वरील विवेचनावरुन प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमालाचा म्हणजेच होंडा कंपनीची दुचाकी याचा नोंदणी क्रमांक एम.एच.–३४–सी.टी.–७६५७ या वाहनाचा अंतरीम ताबा हा अर्जदारास योग्य त्या अटी व शर्ती घालुन दिल्यास न्यायाचा समतोल साधता येईल. सबब, अर्जदार हा जप्त मुद्देमालाचा अंतरीम ताबा खालील अटी व शर्तीचे आधिन राहुन मिळण्यास पात्र आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदार यांचा अर्ज मंजूर करण्यात आला.
२. जप्त मुद्देमाल होंडा कंपनीची दुचाकी याचा नोंदणी क्रमांक एम.एच.–३४–सी.टी.–७६५७ याचा चॅसीस क्र. **ME4JC94DLSG**038037 व इंजिन क्र.**JC94EG**3792441 चा अंतरीम ताबा अर्जदारास खालील अटी व शर्तीवर देण्यात यावा.
३. अर्जदाराने रक्कम रु.६०,०००/– चे सुरक्षा बंधपत्र तपासी अंमलदार यांच्या समक्ष दाखल करावे.
४. तपासी अंमलदार यांनी जप्त दुचाकी वाहनाचा पंचनामा करावा व अर्जदाराच्या खर्चाने सदर दुचाकीची छायाचित्रे काढून घ्यावीत.
५. अर्जदार यांनी सदर दुचाकीच्या रंगरुपात व बांधणीत कोणताही बदल करु नये की, ज्यामुळे दुचाकीचे मुल्य कमी होईल.
६. अर्जदाराने सदर दुचाकीचे हस्तांतरण, विक्री, दान इत्यादी व्यवहार करु नयेत तसेच न्यायालय आणि इतर पोलीस अधिकारी ज्यावेळी त्याची मागणी करेल त्यावेळी हजर करावी.

PANDURANG ANKUSH GHOTE
Digitally signed by PANDURANG ANKUSH GHOTE
Date: 2026.06.01 16:39:02 +0530

स्थळः–सिंदेवाही **(पा. अ. घोटे)**
दि. ०१/०६/२०२६. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सिंदेवाही.